महासागर

बुधवार, दि. 5 मार्च 2025

अमरावती

पान 3

24 तासात पुन्हा एक हत्याकांड

अज्ञात हल्लेखोरांनी कुख्यात गोंडी ला संपविले ■ वडाळी परिसरातील घटना

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.4) – शहरात गेल्या दोन दिवसात दोन हत्येच्या घटना पुढे आल्या आहेत. मसानगंज येथील घटनेनंतर आता फ्रेजरपुरा हद्दीतील वडाळीत एका तरुणाची हत्या करण्यात आली आहे. व्यंकय्यापुरा येथील कुख्यात ऋषिकेश उमेश मोडक उर्फ गोंडी याच्यावर अज्ञातांनी धारदार शस्त्रांनी वार करून मंगळवारी (दि.4) हत्या केली आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा शहरात एकच खळबळ उडाली आहे. हत्येचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. फ्रेजरपुरा पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

अभिषेक मोडक हा कुख्यात गुन्हेगार आहे. त्याची गुन्हेगारी पार्श्वभुमी पाहता पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दीड वर्षांपूर्वी त्याच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई केली होती. दोन

महिन्यांपूर्वीच तो तुरुंगातून बाहेर आल्याची माहिती आहे. अशातच अभिषेक आणि त्याचा अन्य साथीदार दुचाकीवरून वडाळीकडे जात होते.

मात्र यावेळी हल्लेखोरांनी दिव्य सदन केंद्राजवळ धारदार शस्त्रांनी त्यांच्यावर हल्ला केला. यात डोक्याला जबर मार लागल्याने अभिषेक उर्फ गोंडी खाली पडला. त्यानंतर गोंडीचा मित्र जीव वाचवण्यासाठी तेथून पळून गेला. यादरम्यान आरोपींनी गोंडीला मारहाण सुरूच ठेवली. काही वेळाने सर्व आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. दरम्यान फ्रेजरपुरा पोलिसांना घटनेची माहिती मिळताच एक पथक घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर गोंडीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. या घटनेतील हल्लेखोर अद्याप सापडलेले नाहीत. फ्रेजरपुरा पोलिस आणि गुन्हे शाखेच्या पथकाने हल्लेखोरांचा शोध सुरू केला आहे. मागील 48 तासात शहरातील ही दुसरी हत्या असल्यामुळे शहरात दहशतीचे वातावरण आहे. मृतक गोंडी वर विविध घटनांमध्ये गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे.

बडनेरा येथील दोन दुकानांवर धाड

2.20 लाख रुपयांचा गुटखा जप्त

महासागर प्रतिनिधी

बडनेरा,(दि.4)– बडनेरा शहरातील आठवडी बाजार येथील मौलाना आझाद मार्केट आणि महानगरपालिका मार्केटमध्ये सोमवारी (दि.3) रोजी रात्री अन्न व औषध प्रशासन व पोलिस पथकाने टाकलेल्या संयुक्त धाडीत 2 लाख 20 हजार 451 रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे.

जय परशुराम चव्हाण आणि नरेश गजानन चुटे (41) अशी अटक आरोपींची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मिलचाळ येथील रहिवासी असलेल्या जय चव्हाण यांचे बडनेरा शहरातील आठवडी बाजार येथील मौलाना आझाद मार्केटमध्ये दुकान आहे. या दुकानात प्रतिबंध असलेला गुटख्याची मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याची माहिती औषध प्रशासन अधिकारी गजानन वामनराव गोरे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे बडनेरा पोलिसांसह धाड टाकून येथून 1 लाख 35 हजार 215 रुपयांचा माल जप्त करण्यात आला. पोलिसांनी जय चव्हाण याला अटक करून त्याच्याविरुद्ध बीएनएस कलम 223, 274, 275, 123 आणि अन्न व सुरक्षा मानक कायदा 2006 च्या कलम 59 नुसार गुन्हा दाखल केला. आणखी एक कारवाई बडनेरा येथील महापालिका संकुलात असलेल्या शिव प्रोव्हिजनमध्ये करण्यात आली.

कृष्णा नगरमध्येही कारवाई

त्याचप्रकारे अमरावती येथील कृष्णा नगर अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी गजानन गोरे यांनी त्यांच्या पथकासह व पोलिसांनी नरेश गजानन चुटे (41) या रहिवासी या व्यावसायिकाच्या आस्थापनेवर छापा टाकून येथून 85 हजार 236 रुपयांचा बंदी असलेला गुटखा जप्त केला. नरेश चुटेलाही पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी या व्यावसायिकाविरुद्ध बीएनएसच्या कलम 223, 274, 275, 123 आणि अन्न व सुरक्षा मानक कायदा 2006 च्या कलम 59 नुसार गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे अवैध गुटखा व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहे.

अल्पवयीन मुलीचा विनयभंग

अमरावती – अल्पवयीन मुलीला पाठलाग करून, तिला प्रेमाची विनवणी केली. तीने नकार दिल्यामुळे तरुणाने तिला शिविगाळ करीत धमकी दिली. या घटनेची तक्रार 17 वर्षीय मुलीने 1 मार्च रोजी खोलापुर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी सज्जन दिपक धंदर (22, रा. भातकुली तालुका) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

अचलपूरमध्ये टवाळखोराने काढली बालिकेची छेड

अमरावती – शाळेत जात असलेल्या एका 13 वर्षीय बालिकेची टवाळखोराने छेड काढल्याचा संतापजनक प्रकार समोर आला. याप्रकरणी अचलपूर पोलिसांनी त्या रोडरोमीयोविरुध्द पोक्सोसह विविध गुन्हे दाखल करुन त्याला अटक केली.शेख सलीम शेख मेहबुब (वय 29 रा.चावलमंडी) असे त्या रोड रोमीयोचे नाव आहे. तक्रारकर्ता बालिका आपल्या शाळेत जात असताना हा टवाळखोर तिला एकसारखा पाहून लज्जा उपन्न होईल, असे इशारे करित होता. 25 फेब्रुवारी 2025 पासून हा भामटा त्या बालिकेला सतावित होता. 3 मार्च रोजी पुन्हा एकदा ही बालिका शाळेत जात असताना चावलमंडीतील अल हकीम मेडीकल जवळ या बालिकेचा पाठलाग करून रस्ता अडविला आणि नंबर मागू लागला. या प्रकारामूळे घाबरलेल्या बालिकेने हा प्रकार आपल्या पालकांना सांगितला, त्यांना पालकांनी अचलपूर पोलीस स्टेशन गाठून या भामट्याविरुध्द तक्रार देण्यात आली. पोलीसांनी त्याला अटक करुन आपली पुढील कारवाई केली.

विनोद चिमोटेच्या कुटूंबियांना दिला 5 लाखांचा धनादेश

वाघाच्या हल्ल्यात झाला होता ठार

महासागर प्रतिनिधी

चुरणी, (दि. 4) – चिखलदरा तालुक्यातील केली गावातील वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या मासे विक्रेता विनोद चिमोटे ला वनविभागाने 12 तासात आत 5 लाखाची तातडीच्या मदतीचा चेक बहाल केला आहे.

रविवारी (दि.2) रोजी जामलीआर येथील बाजारातून मासे विक्री करुन परत आपल्या गावी ग्राम केली येथे जात असताना खोंगडा नजिक त्याच्या वाघाने हल्ला चढवून त्याला ठार केले. त्याचेवर उपजिल्हा रुग्णालय अचलपूर येथे पीएम करून आज दि.4 मार्च 2025 रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर विनोदच्या पत्नीला धनादेश देण्यात आला वेळी वनविभागाचे अधिकारी यशवंत बहाडे, वनपरिक्षेत्र अधिकारी चंदेल, यशवंत काळे, उपेन बछले यांच्यासह अन्य गावकरी व पिडीत चिमोटे कुटूंबियातील सदस्य उपस्थित होते.

कत्तलीकरिता गोवंश वाहतुक करणारे दोन वाहने पकडली

मोर्शी पोलिसांची धडक कारवाई

महासागर प्रतिनिधी

मोर्शी, (दि.4)– कत्तलीकरिता गोवंश वाहतुक होत असल्याची माहिती मिळाल्यावर मोर्शी पोलिसांनी कारवाई करित दोन वाहने ताब्यात घेतली. या कारवाई करून 13 लाख 28 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मंगळवार 04 मार्च रोजी मोर्शी पोलीस स्टेशन हद्दीतील ग्राम हिवरखेड हद्दीतील मोळवन बोपलवाडी शेतशिवार येथे गुप्त बातमीदारादवारे मिळालेल्या माहितीवरुन कत्तलीकरिता गोवंश वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे रेड करुन पोलिसांनी एम एच 15 डिके 4952 क्रमांकाचे व एम एच 22/ एएन 1560 या क्रमांकाचे असे दोन बोलेरो पिकअप वाहन पकडले. या वाहनातून एकूण 22

गोवंश जनावरे किंमत अंदाजे तीन लाख 28 हजार रुपये असा एकूण 13 लाख 28 हजार रुपये किंमतीचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. सदर वाहन चालकांविरुद्ध गोवंश प्रतिबंधक कायद्या अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, यांचे मार्गदर्शनात पोलीस. निरिक्षक नितीन देशमुख यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक अमोल बुरकुल, आकाश शिवणकर, कर्मचारी निलेश देशमुख, सौरभ धरमठोक, स्वप्निल बायस्कर, छत्रपती करपते यांनी केली आहे.

प्रमिलाताई काळमेघ याचे दु:खद निधन

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 4) – माजी कुलगुरू तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष स्व.दादासाहेब काळमेघ यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती प्रमिलाताई वासुदेवराव काळमेघ (84) यांचे आज सायंकाळी 7 वाजता दीर्घ आजाराने दु:खद निधन झाले. स्व.दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष शरद काळमेघ व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांच्या त्या मातोश्री आहेत. विदर्भाच्या अन्नपूर्णा म्हणून ख्याती असलेल्या प्रमिलाताई काळमेघ यांनी सामाजिक तथा शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर राहिलेले स्व.दादासाहेब काळमेघ यांच्या प्रत्येक वाटचालीत त्यांची साथ देऊन त्यांना यशाच्या शिखरावर नेण्यासाठी साथ केली होती. तसेच हजारो कुटुंबांना आधार देण्यासाठी त्यांनी परिश्रम घेऊन सामाजिक

कार्याचा वसा चालविला होता. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण विदर्भात शोककळा पसरली आहे. त्यांची अंत्ययात्रा 5 मार्च रोजी सुभाष नगर नागपूर येथील त्यांचे निवासस्थान फ्लॅट न. 302, प्रभू पौर्णिमा अपार्टमेंट येथून दुपारी 1 वाजता निघणार असून अंत्यविधी अंबाझरी घाट येथे होणार आहे. त्यांच्या मागे दोन मुले, सुन, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

आली होळी, लागली गाठीची गोडी!

कच्च्या मालाच्या दरवाढीने साखर गाठीचे दर वाढले

नितीन दुर्बुडे

पथ्रोट,(दि.4) – होळी सणाची गोडी वाढविण्याकरिता दरवर्षी महाशिवरात्रीपासून ते गुढीपाडव्यापर्यंत मोठ्या प्रमाणावर साखर गाठी बनवल्या जात असताना सध्या परतवाडा येथे जोरात गाठ्या बनवण्यास वेग आल्याचे दिसते. वाढत्या महागाईमुळे याच साखरगाठीच्या किंमती गगनाला भिडल्याचे चित्र आहे. साखर आणि मजुरीच्या दरात मोठी वाढ झाल्याने यंदा साखर गाठी हाराच्या दरात सुमारे चाळीस टक्क्यांनी वाढ झाली आहे. ऐन होळी, गुडीपाडवा सणात सर्व सामान्यांना महागाईचा फटका बसला आहे. गेल्या काही दिवसांपासून महागाईने उच्चांक गाठला असून त्याचा फटका साखर गाठी हार तयार

करणाऱ्या व्यवसायिकांना ही बसला आहे. साखरे बरोबरच इतर कच्या मालाच्या दरात दुप्पट-तीप्पट वाढ झाली आहे. त्यातच गुजरात मधून आलेल्या साखरगाठीचा ही स्थानिक व्यावसायिकांना मोठा फटका बसला आहे.

होळी ला अर्पण करुन लहान मुलांना रंगपंचमीच्या दिवशी गुलाल लावून ही गाठी घालण्याची पद्धत आहे. मराठी नववर्ष दिन म्हणजेच गुढीपाडवा आता काही दिवसांवर आलाय. घरोघरी त्याची तयारी सुरू झालीय. गुढीपाडव्याच्या दिवशी गुढी उभारण्याबरोबरच साखरगाठीचं महत्त्व आहे. विशेषत- घरातील लहान मुलांना या साखरगाठींचा हार आवर्जून देण्यात येतो. त्याचबरोबर देवाला आणि गुढीलाही ही साखरगाठ अर्पण केली जाते. या काळात लग्न ठरलेल्या व लग्न झालेल्या नववधुला गाठी व साडी चोळी देण्याची प्रथा पुर्वी पासुन आज ही चालु आहे.

साखरगाठी कशी तयार होते

व्यावसायीकांच्या म्हणण्यानुसार 'आम्ही पन्नास वर्षां पुर्वीपासून या व्यवसायात आहोत. आमच्याकडे तयार झालेल्या साखर गाठी मध्यप्रदेश मधील इंदौर, खंडवा, बैतुल येथे दिल्या जातात. आम्ही सुरूवातीला चांगल्या प्रकारचा पाक बनवतो. तो पाक तयार झाल्या नंतर आमच्याकडं साखरगाठीचे वेगवेगळे साचे तयार आहेत. त्या साच्यामध्ये तो पाक ओततो. त्यामध्ये एक बारीक दोरी टाकतो. पाक घट्ट झाल्यानंतर साचा उघडतो. या पद्धतीने ही साखरगाठी तयार होते.

बिबट्याने गोठ्यातील बकरी केली फस्त

कारला येथील घटना

महासागर प्रतिनिधी

चांदूर रेल्वे(दि.4)– चांदूर रेल्वे तालुक्यातील कारला येथील गोठयातील पाच महिण्याची बकरी मारल्याची घटना रविवारी रात्री पावणे दहा वाजता दरम्यान घडली. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहचले व त्यांनी त्या मृत बकरीचा पंचनामा करून त्या परिसरातील पशुधन दुसरीकडे सुरक्षित स्थळी पोहचविले.

कारला गावाजवळ चिरोडी रस्त्यावरील गोठ्यातील पाच महिण्याची बकरी बिबटयाने मारल्याचे रात्री पावणे दहा दरम्यान बकरी मालक बाळकृष्ण विठ्ठल सोनोने यांच्या लक्षात आले. त्यांनी चांदूर रेल्वे वनविभागाला कळविले. चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्र अधिकारी भानुदास पवार व वनपाल नंदकिशोर ठाकरे यांच्या मार्गदर्शनात कारला वनरक्षक अनिल डोंगरे व चांदूर रेल्वे येथील पशुवैद्यकिय चिकीत्सक घटनास्थळी पोहचले व त्या बकरीचा रात्री पंचनामा केला. वनरक्षक डोंगरे यांनी त्या ठिकाणी ट्रॅप कॅमेरा लावुन त्या भागातील पशुधन सुरक्षित स्थळी हलविले. रात्री दीड वाजता दरम्यान बिबट पुन्हा त्या ठिकाणी आला आणि त्याने मारलेली बकरी अर्धी फस्त केल्याचे ट्रॅप कॅमेरातून लक्षात आले. सकाळी त्या बकरीचा चांदूर रेल्वे येथील पशुवैद्यकिय चिकीत्सकांनी पंचनामा करून शवविच्छेदन केले. आर्थिक नुकसान झालेल्या बकरी मालकाला शासकिय नियमानुसार नुकसान भरपाई मिळणार असुन वन्यप्राण्यांना कोणतीही हाणी पोहचणार नाही अशी खबरदारी म्हणून वनविभागाने नोटीस दिली आहे.

आठ दिवस ठेवणार पाळत

कारला परिसरात वन्य प्राणी व गावकऱ्यांच्या पशुधनाच्या सुरक्षतेसाठी चांदूर रेल्वे वनविभागाच्या वतीने त्या घटनास्थळापासुनच्या 10 कि.मी.च्या परिसरात रेकी ऑपरेशन राबवुन पाळत ठेवण्यात येणार असल्याचे चांदूर रेल्वेचे आरएफओ भानुदास पवार यांनी सांगीतले

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा मुख्याध्यापका विना

मुख्याध्यापक पदोन्नतीच्या प्रतीक्षेत | ज्येष्ठ शिक्षक निवृत्तीच्या जवळ पोहोचले

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 4) दर्जेदार शिक्षणामुळे जिल्हातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी आपली वेगळी छाप उमटवली आहे. मात्र जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळेतील उच्च श्रेणी मुख्याध्यापकांची पदे रिक्त असल्याची खंत पालकवर्गातून होत आहे. जिल्हा परिषदेने उच्च श्रेणी मुख्याध्यापक पदोन्नती संदर्भात यादी प्रसिद्ध केली.मात्र मुख्याध्यापक पदोन्नती न केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांमध्ये उच्च श्रेणी मुख्याध्यापक नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे शालेयस्तरावर निर्णय घेण्यास अनेक अडचणी येत असून महत्त्वाचे निर्णय घेण्यासही विलंब होत आहे.शाळेतील शिक्षकांना अध्यापन करून

उच्च श्रेणी मुख्याध्यापक पदाचा प्रभार सांभाळावा लागत आहे.त्यामुळे प्रभार सांभाळणाऱ्या शिक्षकांवर ताण येत आहे.उच्च श्रेणी मुख्याध्यापक हे महत्त्वाचे पदे लवकरात लवकर भरावीत,अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

अनेक शाळांवर आता प्रभारी मुख्याध्यापक असून त्यांच्यावरच मुख्याध्यापकांची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे शाळेच्या व्यवस्थापनावर या प्रभारीपदाचा परिणाम होत आहे. तसेच,ज्या वरिष्ठ शिक्षकांनी आता मुख्याध्यापक होण्याची पात्रता पूर्ण केली आहे, त्यांनाही या पदाची आस लागली आहे. विशेष म्हणजे पदोन्नतीसाठी पात्र असलेले ज्येष्ठ शिक्षक आता निवृत्तीच्या जवळ पोहोचले आहेत. त्यामुळे किमान निवृत्त होताना तरी पदोन्नती व्हावी, अशी त्यांची आशा आहे.

"शाळेच्या व्यवस्थापनासाठी, प्रशासनासाठी उच्च श्रेणी मुख्याध्यापक पद महत्त्वाचे पद आहे.दर्जेदार शिक्षणासाठी शाळेत ठोस उपाययोजनांची गरज आहे.त्यामुळे उच्च श्रेणी मुख्याध्यापक हे महत्त्वाचे पद भरणे आवश्यक आहे.

राजेश सावरकर,
महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती,अमरावती

जबरी चोरी, घरफोडीच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक

गुन्हे शाखा युनीट क्रमांक 1 ची कारवाई

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 4) - जबरी चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यातीन दोन आरोपींना यवतमाळातून अटक करण्यात गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाला यश मिळाले. पंकज राजू गोंडाणे (28, रा. चवरे नगर, अमरावती) व सागर जनार्धन गोगटे (34, रा. गांधी चौक, तुळजागीरवाडा, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींनी फ्रेजरपूरा हद्दीतील सराफ ले-आउट येथील जबरी चोरी व राजापेठ हद्दीतील घरफोडीच्या गुन्ह्याची कबुली दिली आहे.

राजापेठ पोलिस ठाण्यात भाष्करराव किसनराव हागे (73, रा. गोकूल कॉलनी, एकवीरानगर, अमरावती) यानी तक्रार दिली होती की, 3 जानेवारी रात्री 12 ते सकाळी 7 वाजतादरम्यान त्यांच्या अंगणातील ॲक्टीवा मोपेड वाहन व घराच्या बेडरुममधील 20 हजाराची रोख चोराने लंपास केली. या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदवून तपास सुरु केला होता. सदर गुन्हाचा समांतर तपास गुन्हे शाखा युनीट क्रमांक 1 करीत होते. दरम्यान गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषनावरून या गुन्ह्यात रेकॉर्डवरिल गुन्हेगार पंकज राजू गोंडाणे व सागर जनार्धन गोगटे यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी 1 मार्च रोजी दोन्ही आरोपींना यवतमाळ येथून अटक केली. त्यांच्या ताब्यातून गुन्हातील 50 हजार रुपये किमंतीचे ॲक्टीवा वाहन क्रमांक एमएच 27 एएच 7562 जप्त करण्यात आली. सदर गुन्हाच्या तपासात आरोपींनी फ्रेजरपूरा येथील सराफ ले-आउट येथे रात्रीच्या वेळी खिडकीचे लोखंडी ग्रील तोडून एका महिलेसह त्यांच्या आईला चाकूचा धाक दाखवून जबरी चोरीचा गुन्हा केल्याचेही निष्पन्न झाले. त्यामुळे पोलिसांनी गुन्हातील 29 ग्रॅम सोन्याचे दागिने (किमंत अंदाजे 2 लाख 10 हजार) जप्त केला आहे.

आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता

गुन्हे शाखा युनीट क्रमांक 1 चे अधिकारी व अमंलदार सराफ ले-आउट येथील जबरी चोरीच्या गुन्ह्याचा सातत्याने तपास करीत होते. पोलिसांनी सराफ लेआऊट परिसरातील सिसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहीतीचे आधारे कुख्यात रेकॉर्डवरिल गुन्हेगार पंकज राजू गोंडाणे याला निष्पन्न केले. पोलिस त्याचा बरेच दिवसापासून शोध घेत होते. दरम्यान आरोपी व त्याचा साथीदार याना यवतमाळ ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून आणखी गुन्हे उघड येण्याची शक्यता आहे.

या पथकाची कामगिरी

सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलिस उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, पोलिस हवालदार सतीष देशमूख, फिरोज खान, सचिन बहाळे, अलीमउददीन खतीब, नाझीमउददीन सैयद, विकास गुढधे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम, रोशन माहुरे, किशोर खेंगरे यांच्या पथकाने केली.

देऊरवाडा शिव मंदिराबाबत पुरातत्व विभागाने लक्ष द्यावे - तुषार भारतीय

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 4) देऊरवाडा शिव मंदिराबाबत जिल्हाधिकारी यांच्यासह पुरातत्व विभागाने लक्ष द्यावे,अशी मागणी माजी स्थायी समिती सभापती तुषार भारतीय यांनी केली आहे. भारतीय यांनी मंदिराला भेट दिली असून यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना (दि.2) पत्र दिले.

हे मंदिर किती वर्ष जून आहे,या करिता जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालून पुरातत्व विभागातील अधिकाऱ्यांना पाठवण्याची आवश्यकता आहे. अनेकदिवस हे मंदिर जमिनीच्या आत असल्याने मंदिराची तपासणी होणे आवश्यक आहे,असे ते म्हणाले.

चांदूर बाजार भागातील देऊरवाडा हे ऐतिहासिक तसेच पौराणिक महत्व असलेले गाव आहे. अनेक धार्मिक ग्रंथात असा उल्लेखही सापडतो. या गावात पूर्णा नदीला पयोष्णी म्हणून ओळखल्या जाते. ती देऊरवाड्याला उत्तरमुखी वाहत असल्याने वेगळ्याप्रकारचे महत्व आहे. या ठिकाणी नृसीहांच मंदिर आहे. या पूर्णा

नदीत स्नान केल्याने पुण्य प्राप्त होत असल्याची चर्चा आहे. दहा दिवसापूर्वी नदी काठी देऊरवाड्यातील तरुणांनी खोदकाम करताना एक मंदिर आणि भुयारात शिवलिंग, एक देवीची मूर्ती सापडल्याने अनेक शिवभक्त येथे दर्शनाला येत आहे.

मंदिराची बांधणी मूर्ती आणि शिवलिंग किती वर्ष जून आहे. कोणत्या पद्धतीचा दगड आहे. बांधकाम किती वर्ष जून या बाबत भक्तांमध्ये उत्सुकता आहे. हिंदू रितीरीवाज प्रमाणे ज्या ठिकाणी शिवलिंग ची स्थापना असते त्या ठिकाणी नंदी असते, ते शोधण्यासाठी अजून खोदकाम करणे गरजेचे आहे, या करिता पुरातत्व विभागाचे मार्गदर्शन असणे गरजेचे आहे,असे तुषार भारतीय म्हणाले.

विविध योजनांसाठी नि:शुल्क अर्ज पाठवा!

धारणीत आदिवासी विकास प्रकल्पाकडून आवाहन

महासागर प्रतिनिधी
धारणी,(दि.4)- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांच्या कार्यक्षेत्रात केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना 2024-25 अंतर्गत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी विविध योजनांसाठी अर्ज मागविण्यास सुरुवात झाली आहे. आदिवासी महिला-पुरुष बचत गटांसाठी दालमिल उभारणे, प्रिंटिंग प्रेस मशिन खरेदी करणे, तसेच वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी विविध व्यवसाय सुरू करणे (नळ फिटिंग, इलेक्ट्रिकल, ऑटोमोबाईल, सुतारकाम इत्यादी) आणि सुशिक्षित युवकांसाठी सेतू केंद्र सुरू करणे यांसारख्या योजनांसाठी 85 टक्के अनुदान दिले जाणार आहे. धारणी, चिखलदरा, अंजनगाव आणि अचलपूर तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी अर्ज धारणी येथील प्रकल्प कार्यालयात उपलब्ध आहेत. नांदगाव खंडेश्वर, भातकूली, अमरावती, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे आणि दर्यापूर तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी अपर आयुक्त आदिवासी विकास, अमरावती येथे अर्ज उपलब्ध आहेत. तसेच, मोर्शी, वरुड, तिवसा आणि चांदूर बाजार तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी उप कार्यालय मोर्शी येथे अर्ज उपलब्ध आहेत. अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख 12 मार्च 2025 आहे. अधिक माहितीसाठी 07226-224217 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प कार्यालयाकडून करण्यात आले आहे.लाभार्थी निवड करताना दारिद्ररेषेखालील लाभार्थी, अपंग, विधवा, परितक्त्या आणि निराधार महिलांना प्राधान्य दिले जाईल. अशी माहिती प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी दिली.

चांदुरबाजारात घरफोडी

अमरावती - चांदुरबाजार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील श्रीकृष्ण कॉलनी परिसरात घरफोडी झाल्याची घटना 1 मार्च रोजी उघडकीस आली. कार्तिक अरुण ढवळी (30, रा. श्रीकृष्ण कॉलनी, चांदुररेल्वे) हे शेगाव दर्शनाकरिता गेले होते. दरम्यान चोराने त्यांच्या घरातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख असा एकुण 1 लाख 45 हजाराचा मुद्देमाल लंपास केला. कार्तिक ढवळीच्या तक्रारीवरून चांदुरबाजार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

डफरीन परिसरात होणार...

100 खाटांचे माता व बाल संगोपन केंद्राची नवी इमारत

33 .40 कोटींचा निधी मंजूर

सुलभा खोडके यांच्या प्रयत्नाला यश

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 4) - येथे आरोग्य सेवांचा विस्तार व बळकटीसाठी आ. सुलभा खोडके यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असल्याने रुग्णांना नवी आरोग्य संजीवनी मिळाली आहे. अशातच आता गर्भवती महिलांना सुरक्षित प्रसूतीसाठी मदत व्हावी , आई आणि बाळाला आधार मिळावा यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन)परिसरात 100 खाटांचे माता बाल संगोपन केंद्राची नवीन इमारत बांधण्यात येणार आहे. या करिता शासनाकडून 33.40 कोटींचा निधी मंजूर झाला असून येत्या मेपासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

या आ. सुलभा खोडके यांनी यासाठी सातत्याने प्रयत्न केले होते. त्यामुळे आ. सुलभा खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच महायुती सरकारचे आभार मानले आहे. अमरावती जिल्ह्यात महिला व बालकांच्या आरोग्याला घेऊन अनेक उपाययोजना करण्यात येत असतांना धारणी-मेळघाट दुर्गम भाग, ग्रामीण क्षेत्र तसेच शहरी भागातील झोपटपट्टी क्षेत्र अशा ठिकाणी आजही कूपोषण, माता मृत्यू, बालमृत्यू सारखी समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे महिलांचे प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण, पोषण आहार, औषधी, कुटुंब कल्याण, बाळांचे आरोग्य अशा विविध बाबतीत चांगल्या सुविधा निर्माण करण्याला घेऊन आ. सुलभा खोडके यांनी आरोग्य प्रशासनासोबत संवाद व समन्वय साधला. त्याअनुषंगाने आ. सुलभा खोडके यांनी स्थानिक आरोग्य प्रशासनासोबत वारंवार बैठका घेऊन महिला व बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने दीर्घकालीन उपायोजना करण्याच्या सूचना केल्या. तसेच या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर निधी उपलब्धतेसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा केला. याची फलश्रुती म्हणून आता जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन)परिसरात 100 खाटांचे माता बाल संगोपन केंद्राची नवीन इमारत बांधकामाकरिता शासनाकडून 33.40 कोटींचा निधी मंजूर झाला आहे. तसेच येत्या मे 2025 पासून नूतन इमारतीच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

महिला व बाळांना मिळणार आधार-आ. खोडके

माता-बाल संगोपन कार्यक्रम हा कुटुंब कल्याण आणि आरोग्य क्षेत्रातील एक कार्यक्रम आहे. या कार्यक्रमातून प्रसूती, औषध, आणि इतर साहित्याची व्यवस्था केली जाते. याशिवाय, बालकांच्या विकासासाठीही काही योजना राबवल्या जातात. या योजनेअंतर्गत अनाथ, निराधार, बेघर आणि शारीरिक व्यंग किंवा इतर आपत्ती असलेल्या बालकांना मासिक अनुदानही दिले जाते. संगोपनकेंद्राद्वारे गर्भवती महिलांना सुरक्षित प्रसूतीसाठी मदत व बाळाला आधार मिळणार आहे. यातून प्रसूतीपूर्व काळात महिलांना त्यांच्या सध्याच्या आरोग्य स्थितीचे निरीक्षण व प्रसूतीनंतर पोषण आरोग्याच्या बाबतीत सुविधा मिळणार आहे. तसेच नवजात बालकास पुरविल्या जाणाऱ्या सर्व आरोग्यसेवांचे नियोजन करणे सोयीचे होईल. कुपोषणमुक्ती तसेच महिला-बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने चांगले काम करता येणार आहे.

जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांना 'बालस्नेही पुरस्कार' प्रदान

मुंबई येथे करण्यात आले सन्मानित

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 4) - महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगातर्फे बालस्नेही पुरस्कार 2024 अंतर्गत उत्कृष्ट जिल्हाधिकारी म्हणून जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांना बाल हक्कांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल आज मुंबई येथे गौरविण्यात आले.

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, डॉ. पंकज भोयर, आमदार संजय केळकर, मनिषा कायंदे, प्रशांत नारनवरे, पोलिस अपर महासंचालक अश्वती दोरजे, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष सुशीबेन शहा यांच्या उपस्थितीत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात बालकांच्या हक्कांसाठी अनेक प्रभावी योजना राबवण्यात आल्या आहेत. विशेषत: बालविवाह प्रतिबंध, बालकामगार निर्मूलन आणि शिक्षण हक्कांच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने पुरस्कारासाठी निवड केली. जिल्हाधिकारी कटियार यांनी, हा पुरस्कार संपूर्ण टीमच्या एकत्रित प्रयत्नांचे फळ आहे. आम्ही भविष्यातही बालकांच्या कल्याणासाठी कार्यरत राहू, अशी प्रतिक्रिया पुरस्कार स्विकारल्यानंतर दिली. पुरस्काराबद्दल जिल्हा प्रशासन आणि नागरिकांनी जिल्हाधिकारी कटियार यांचे अभिनंदन केले आहे.

अंगणवाडी सेविका, मदतनीसच्या 300 पदांची महाभरती

तालुकास्तरावर प्रक्रिया सुरू | 20 मार्चपूर्वी भरती प्रक्रिया पुर्ण होणार

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 4) - महिला व बालविकास विभागाअंतर्गत 111 अंगणवाडी सेविका व 189 मदतनीस अशा 300 पदांकरिता जिल्ह्यात महाभरती राबविली जात आहे. या प्रक्रियेला तालुकास्तरावर सुरूवात करण्यात आली असून 20 मार्च पुर्वी संपूर्ण प्रक्रिया पुर्ण करण्याचे आदेश जिल्हास्तरावर देण्यात आले आहेत.

जिल्ह्यात महिला व बालविकास विभागाअंतर्गत गावस्तरावर लोकसंख्येच्या प्रमाणात अंगणवाडी केंद्र कार्यरत आहे. एका अंगणवाडी केंद्रात अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची पदे मंजुर आहेत. जिल्ह्यात 2592 अंगणवाडी केंद्र असून यामध्ये सद्यास्थितीत 2 हजार 481 पदे कार्यरत आहेत. तसेच 111 अंगणवाडी सेविकांची पदे रिक्त आहेत. तर 2409 मदतनीस कार्यरत असून 189 पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमुळे अंगणवाडी केंद्रामध्ये बालकांना असुविधा निर्माण होत असताना रिक्त पदे भरण्याची मागणी गावस्तरावरून होत होती. त्यामुळे शासनस्तरावर रिक्त जागा भरण्याला मंजुरी मिळाल्याने तालुका प्रकल्प कार्यालयातून अंगणवाडी सेविका आणि मतदनीस अशा 300 जागांची महाभरती राबविली जात आहे.याकरिता मोठ्या प्रमाणात महिलांचे अर्ज प्रकल्प कार्यालयांमध्ये दाखल झाले आहेत. 20 मार्चपूर्वी ही प्रक्रिया पुर्ण करण्याचे आदेश जिल्हास्तरावरून देण्यात आले आहेत.

आरटीई : जिल्ह्यात 1380 बालकांचे प्रवेश

अद्यापही 1016 प्रवेश बाकीच

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 4) - आरटीई प्रवेश प्रक्रियेत अठरा दिवसांत केवळ 1 हजार 380 प्रवेश निश्चित झाले आहेत. प्रवेशाकरिता केवळ 6 दिवस शिल्लक राहीले असून अद्यापही संदेश प्राप्त झालेल्या 1 हजार 16 पाल्यांचे प्रवेश निश्चित झालेले नाही. पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा,असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

2025-26 या शैक्षणिक वर्षांकरिता आरटीई प्रवेशाला 14 फेब्रुवारीपासून सूरूवात करण्यात आली. 28 फेब्रुवारीपर्यंत सदरचे प्रवेश स्विकारले जाणार होते. मात्र, याला 10 मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. यापुर्वी तालुकास्तरीय समितीकडून कागदपत्रांची पडताळणी केली जात होती. त्यांच्या शिफारशीनंतरच संबधित शाळांमध्ये पाल्यांचे प्रवेश निश्चित केले जाणार आहे. जिल्ह्यात 225 शाळांमध्ये 2 हजार 430 जागांकरिता आरटीईअंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. जिल्ह्यात 8 हजार 141 प्रवेश अर्ज प्राप्त झाले. या अर्जांवर सोडत काढण्यात आली. अशा पहील्या टप्प्यात 2 हजार 396 विद्यार्थ्यांची यादी घोषित करण्यात आली आहे. या पालकांना त्यांच्या मोबाईलवर प्रवेश निश्चित करण्याबाबत संदेशही प्राप्त झाले. त्यानंतर पडताळणी समितीकडे कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. या अठरा दिवसांत 2 हजार 396 पैकी केवळ 1 हजार 380 पाल्यांचेच प्रवेश निश्चित झाले आहेत. बहुतांश अर्ज पडताळणी समितीकडे प्रलंबित असून अन्य पालकांनी मात्र अद्यापही समितीकडे कागदपत्रांची पडताळणी सुरू केली नाही. त्यामुळे संबधित पालकांनी त्वरीत समितीकडून पाल्यांचा प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

लिफ्ट घेणे वृध्दाला पडले महागात

ट्रकखाली आल्याने दुचाकीवरील वृद्धाचा मृत्यू

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 4) - एका दुचाकीचालकाने ट्रकला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. त्यातच दुचाकीवर मागे बसलेला एक इसम ट्रकच्या चाकाखाली आल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही दुर्देवी घटना लाखनवाडी घोडगाव मार्गावर 1 मार्च रोजी सायंकाळाच्या सुमारास घडली.

गणेश दयाराम देवडेकर (58) रा.घोडगाव (कविठा) असे मृतकाचे नाव आहे. गणेश देवडेकर हे लाखनवाडी येथे सपत्नीक एका लग्न समारंभासाठी गेले होते. लग्न समारंभ आटोपून ते पत्नीसह पायीच येत असताना पाय दुखल्यामुळे त्यांनी एका अज्ञात दुचाकीचालकाला लिफ्ट मागितली. दुचाकीचालकाने गणेश देवडेकर यांना दुचाकीवर बसवून घेतले. सुदैवाने त्यांच्या पत्नी मात्र दुचाकीवर न बसता पायीच निघाल्या. काही अंतर पुढे गेल्यानंतर समोरील ट्रकला दुचाकीचालकाने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी दुचाकीचालकाचे नियंत्रण सुटल्याने गणेश देवडेकर खाली कोसळले आणि ट्रकच्या चाकाखाली आल्याने ते चिरडले गेले. त्यांना मृतावस्थेत अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. रविवार सुट्टीचा दिवस असल्याने शवविच्छेदन होऊ शकले नाही. घटनेची माहिती मिळतात घोडेगावचे माजी सरपंच नामदेव तनपुरे यांच्यासह ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत सर्वतोपरी मदतीचा हात दिला. पोलिसही घटनास्थळी दाखल झाले होते. दरम्यान, मोलमजुरी करणाऱ्या गणेश देवडेकर यांच्या अपघाती मृत्यूने गावात शोककळा पसरली आहे.

परागीकरण होत नसल्याने कांदा बीज उत्पादनात घट

विषारी कीटकनाशकांमुळे मधमाशांचा मृत्यू | कांदा बियाणे उत्पादकांमध्ये चिंता

महासागर प्रतिनिधी

पथ्रोट,(दि.4) - विषारी कीटकनाशकांच्या अनिर्बंध वापरामुळे मधमाशांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. मधमाशा परागीभवनासाठी अत्यंत महत्वाची भूमिका बजावतात. मात्र, पिकांवर वारंवार विषाची मात्रा फवारल्या जात असल्याने मधमाशांचा मृत्यू होत आहे. यामुळे त्यांची संख्या घटली आहे. त्याचा थेट परिणाम कांदा बियाणे उत्पादनावर झाला आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे.

शेतीमध्ये विषारी कीटकनाशकांचा अनिर्बंध वापर हे मधमाशांच्या घटत्या संख्येचे प्रमुख कारण ठरले आहे, कीटकनाशकांमुळे मधमाशांच्या मज्जासंस्थेवर परिणाम होतो, ज्यामुळे त्या मरतात. शेतीसाठी जमिनीचा वापर वाढल्यामुळे मधमाशांच्या नैसर्गिक अधिवासाचा नाश झाला आहे.



मधमाशांच्या कमतरतेमुळे कांदा बियाणे उत्पादनात मोठी घट झाली आहे. कांदा बियाण्यांचा दर्जाही घटला आहे. कांदा बियाणे उत्पादनात घट झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच पर्यावरणावरही गंभीर परिणाम होऊ शकतो, असे तज्ञांचे मत आहे.

एकत्रित प्रयत्नांची गरज

मधमाशांची घटती संख्या ही एक गंभीर समस्या आहे, त्यावर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. शेतकरी व शासनाने एकत्रितपणे प्रयत्न करून मधमाशांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. अचलपुर तालुक्यात पथ्रोट येथे तयार होणारे कांदा बियाणे उच्च दर्जाचे असते. या स्थानीक गावरान कांदा बियाण्यांपासून तयार होणारा कांदा मोठा, आकर्षक आणि टिकाऊ असती. कांदा लागवडीसाठी आवश्यक असलेले हवामान आणि जमीन अचलपुर अंजनगाव तालुक्यात उपलब्ध आहे. त्यामुळे कांद्याचे उत्पादन घेणाऱ्यांची संख्या अधिक आहे. तालुक्यातील शेतकरी कांदा लागवडीमध्ये अनुभवी आहेत. एक पीक पद्धतीदेखील कारणीभूत ठरली आहे. शेतकरी एकाच प्रकारची पिके घेत असल्यामुळे मधमाशांना आवश्यक असणारे विविध प्रकारचा फुलोरा उपलब्ध होत नाही. मधमाशांची संख्या कमी झाल्यामुळे कांदा बियाणे उत्पादनात मोठी घट झाली आहे. यामुळे कांदा बीज घेणे कठीण झाले आहे. शासनाने यावर तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी कांदा उत्पादक करतात.

आधुनिक तंत्रज्ञानामूळे उत्पादनात वाढ

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उच्च दर्जाचे कांदा बियाणे तयार कांद्याला आणि कांदा बियाण्याला मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळतो. येथील शेतकरी पारंपरिक आणि आधुनिक दोन्ही पद्धती वापरून कांदा उत्पादन करतात त्यामुळे चांगल्या दर्जाचा कांदा आणि बियाणे मिळण्यास मदत होते. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होत आहे.

प्रथम पारितोषीकावर परतवाड्याच्या एमबीएम ने उमटविली मोहर

दणदणीत पार पडले राज्य स्तरीय व्हॉलीबॉल सामने

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि.4) - येथील हरहर महादेव बहुउद्देशिय संस्था, न्यु हनुमान नगर येथील निळकंठ गणेशोत्सव मंडळ, श्री ईच्छापुर्ती गणेशोत्सव मंडळ तथा श्री रामकमल क्रिडा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने सलग चौथ्या वर्षी महेंद्र कॉलनी मार्गावरील नरेडी नगर स्थित वीर हनुमान क्रिडांगणावर राज्य स्तरीय व्हॉलीबॉल सामन्यांचे 28 फेब्रुवारी ते 1 मार्च 2025 असे दोन दिवसीय आयोजन करण्यात आले होते. या सामन्याच्या अखेरच्या दिवशी परतवाडा येथील एमबीएस च्या संघाने प्रथम पारितोषिकावर विजयाची मोहर उमटविली.

28 फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या या सामन्यांचे उद्घाटक म्हणून अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सुलभा खोडके, पोलीस अधिक्षक विशाल आनंद सिंगुरी, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अमरावतीचे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर व यश संजयजी खोडके श्री अजयजी पाटेकर मंडळ यांची अधिकारी प्रमुख उपस्थिती होती. तर 1 मार्च रोजी पार पडलेल्या समारोपीय कार्यक्रमामध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, गाडगे नगर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गिरी साहेब,शोध प्रतिष्ठान चे अध्यक्ष यश संजयजी खोडके,छत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू अभिजित इंगोले,श्री शंकरजी मुळे, तुषार परदेशी(नाशिक महापारेषण चे अधिकारी) यांच्या सह अन्य मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते विजय प्राप्त संघांना बक्षीसांचे वितरण करण्यात आले. आशिष ठाकरे (शिवसेना शहरप्रमुख अमरावती), निता प्रमोद राऊत (माजी नगरसेविका),अक्षय जलतारे, पवन भांबुरकर, प्रमोद राऊत, पियुष मोरे, प्रमोद बनसोड, पवन वानखडे, क्षितिज बोन्डे, अमोल पाटेकर, सुनील मोहोड, सतीश चौधरी,आनंद डहाके, मंगेश भांबूरकर, रवी नेवारे, निलेश भोयर, शुभम तायडे, गौरव सावरकर,निलेश रोकडे, दीपक अकोलकर, मंगेश वानखडे, राहुल चिंचमलातपूरे, पवन कुंबलवार, गोपाल देशमुख, संतोष माहुलकर आदींच्या नेतृत्वात या सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते.

राज्यभरात 16 संघांचा समावेश

राज्य भरातील तब्बल 16 संघ या सामन्यात उतरले होते. यामध्ये प्रथम पारितोषिकाचे मानकरी परतवाड्याच्या एसबीएम संघ ठरला, तर द्वितीय पारितोषिक नागपूरच्या रॉयल अकॅडमीने पटकाविले, तर तृतीय पारितोषिक नागपूच्या युथ बॉईज संघाने पटकाविले. चतुर्थ पारितोषिक बडनेरा येथील अमर मंडळाने पटकाविले, बेस्ट स्मॅशर पुरस्कारावर नागपूरच्या अथर्व उमाठे, बेस्ट लिफ्टर पुरस्कारवर परतवाडा येथील इम्रान खान, बेस्ट लिबरो पारितोषिकावर बडनेरा येथील राहुल मुळे तर मॅन ऑफ द टूर्नामेंट पारितोषिकावर नागपूरच्या मयूर तारळे यांनी विजयाची मोहर उमटविली.

आरटीई प्रवेशाच्या थकबाकीने शाळा आर्थिक संकटात

- शासन उदासिन, व्यवस्थापन डबघाईस
- मेस्टाचे गट शिक्षणाधिकाऱ्यां ना निवेदन

महासागर प्रतिनिधी

अचलपूर,(दि.4) - शासनाने शालेय विद्यार्थ्यांचे प्रवेश शिक्षणाच्या अधिकार कायदा अर्थात आरटीईनुसार सुरु केले असून शाळांना 25 टक्के प्रवेश पालकांकडून शूल्क न घेता करावे लागतात. या विद्यार्थ्यांच्या शूल्काची रक्कम शासनाने शाळांना अदा करण्याची तरतूद आहे. मात्र गेल्या पाच-सहा वर्षांपासून शासनाकडून शाळांना या प्रवेशाच्या शूल्काची रक्कमच अदा करण्यात आलेली नाही. परिणामी शाळा व्यवस्थापन आर्थिक संकटात सापडले आहे. यापुढे आरटीईनुसार 25 टक्के विद्यार्थ्यांचे प्रवेश करताना शूल्क पालकांकडून वसूल केले जाईल आणि शासनाने ती रक्कम अदा केल्यानंतर पालकाला परत केली जाईल, असा निर्णय महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टिज असोसिएशनने (मेस्टा)ने घेतला आहे.

यासंदर्भात मेस्टाच्या पदाधिकार्यां नी गट शिक्षणाधिकारी राम चौधरी यांची भेट घेउन त्यांना एक निवेदन सादर केले. शिक्षणाचा अधिकार कायद्यानुसार शाळांमध्ये प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांच्या शूल्काची रक्कम त्याच वर्षी 31 मार्च पूर्वी शाळा व्यवस्थापनाला शासनाने अदा करणे, अनिवार्य आहे. असे असले तरी शासनाकडून 2019 पासून या रकमेची पूर्तता करण्यात आलेली नाही. परिणामी शाळा व्यवस्थापन डबघाईस आले आहे. असे निवेदनात म्हटले आहे. प्रत्येक शाळेचे लाखो रुपये शासनाकडे थकित आहेत. या थकबाकीमुळे शाळांचे व्यवस्थापन कोलमडले आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा पुरवणे, शिक्षकांचे व शिक्षकेतर कर्मचार्यांलचे पगार व इतर सोई सुविधा यांची पूर्तता करणे संस्थांना कठीण झाले असल्याचे निवेदनात नमूद आहे.

त्यामुळे महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोसिएशनने चालू सत्र 2025-26 पासून आरटीई प्रवेशतील विद्यार्थ्यांच्या पालकांकडून शैक्षणिक शुल्क घेण्याचा आणि शासनाकडून प्रतीपूर्ती झाल्यानंतर पालकांना परत करण्याचा निर्णय घेतला असल्याचे या निवेदनातून कळविण्यात आले. निवेदन देताना मेस्टाचे विभागीय अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण गोरडे, धनंजय मस्के, पंकज शर्मा, प्राचार्या संगिता गोरडे प्रामुख्याने उपस्थित होते.

गाडगेबाबा जयंतीदिनी अंजनगाव बारीत सामूहिक भजन

महासागर प्रतिनिधी

अंजनगाव बारी,(दि.4)- अंजनगाव बारी येथील प्रतिष्ठित नागरिक सुधाकर तलमले यांच्या निवासस्थानी वैराग्यमूर्ती श्री संत गाडगे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त विविध भजन मंडळाच्या सामूहिक भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सुभाष तलमले यांच्या हस्ते संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर झालेल्या भजनाच्या कार्यक्रमांमध्ये अंजनगाव बारी येथील शिवराष्ट्रीय भजन मंडळ, दीपक भजन मंडळ आणि श्री गुरुदेव सेवा भजन मंडळाने सहभाग घेतला. या मंडळांच्या कलावंतांनी विविध संतांच्या रचनांचे सुरेख सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाला रूपलाल तलमले, प्रकाश तायडे, दिलीप अंबडकार, गुणवंत शेलोकार, नारायण न्यायखरे, प्रकाश साखरवाडे, गडलिंग, खडसे, बेरड, येरणे, बबलू राठोड, आकाश इंगोले, झुंबडे, टिळकराम हटवार, पांडे, राजू गुलालकरी यांच्यासह गावातील महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वार्थापायी सत्ताधाऱ्यांनी महाराष्ट्राची दुर्दशा केली!

डॉ. सुधीर भोंगळे यांची टीका ● भक्तीधाम मध्ये व्याख्यानमाला

महासागर प्रतिनिधी

चांदूर बाजार,(दि.4)- राजकारण म्हणजे नोकरी नव्हे. ते जनसेवेचे एक माध्यम आहे. लोकांच्या भावना, लोकांचे मत, भौगोलिक स्थिती यांची सांगड घालून विकास साधायचा असतो. मात्र मागिल काही वर्षांच्या राजकारणाचा विचार करता, भ्रष्टाचारातून आपल्याला जास्तीत जास्त कमिशन कसे मिळेल, याचाय विचार अधिक होत आहे. स्वार्थापायी सत्ताधार्यां नी महाराष्ट्राची दुर्दशा केली आहे, अशी टीका पूणे येथील नामवंत लेखक, पत्रकार व अभ्यासक डॉ. सुधीर भोंगळे यांनी केली. चांदूर बाजार येथील भाक्तीधामध्ये आयोजित व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना 'अस्वस्थ महाराष्ट्र दशा आणि दिशा' या विषयावर ते बोलत होते. माऊली सभागृहात या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

आज योजना आखल्या जातात. त्यातून कोट्यावधींची कमाई केल्या जाते. राजकारण्यांना कंत्राटदारांकडून काम सुरू होण्या आधीच अगाउ रक्कम दिल्या जाते. राजकारणातील मोठ्या धेंडांना कमिशन पोहचले की, नंतर ती योजना निधी अभावी बंद पडते. स्वतच्या कमाईसाठी सत्तेतील भ्रष्टाचारी चार हजार कोटींची, तरतूद असलेल्या कामासाठी 26 हजार कोटींचे टेंडर काढतात. कमिशनखोरांना रक्कम मिळाली की योजना बंद पडते. यासाठी मंत्रालयात एका-एका व्यक्तीकडे चारशे ते साडे चारशे एजंट आहे. असा आरोप भोंगळे यांनी केला.

राजकारणांच्या भ्रष्टाचारामुळे आज महाराष्ट्रावर 2 लाख कोटींचे कर्ज झाले आहे. फुकटच्या योजनांमुळे तिजोरीत खडखडाट आहे. अनेक ठेकेदार भिकारी झाले आहे. काम पूर्ण झालेल्या ठेकेदारांचे पैसे द्यायला शासनाकडे पैसा नाही. शासन ठेकेदारांचे पैसे पुढील दहा वर्षही देऊ शकत नाही. एवढी आर्थिक स्थिती डबघाईस आली आहे. ज्या योजनांसाठी निधी दिला तो त्या योजनांवर खर्च होत नाही. त्यामुळे परदेशी संस्थांनीही महाराष्ट्राला आर्थिक मदत देणे बंद केले आहे. यावरून स्वार्थापोटी सत्ताधार्यां नी महाराष्ट्राची दशा केली आहे, असे भोंगळे म्हणाले.

आपल्या व्याख्यानात पुढे बोलतांना भोंगळे म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकारांनी सत्तेत राहण्यासाठी फुकट वाटण्याची पध्दत सुरु केली. त्यामुळे लोक ऐतखाऊ झालेत. श्रमाचे मुल्य कमी झाले. याचा सर्वाधिक फटका शेतकर्यांना बसतो आहे. अशातच 18 ते 28 टक्के जीएसटीने सर्वासामान्याचे कंबरडे मोडले. आज सरकार शेतकर्यांना स्वामीनाथन आयोग लागू करून, 50 टक्के नफा तर सोडाच हमीभावही देऊ शकत नाही. आज सरकार तरुणांना रोजगार देऊ शकत नाही, लोकशाही मार्गाने निवडून आलेली सरकारे, सरकार टिकविण्यासाठी लोकशाहीचे अवमूल्यन करित आहे. तरी ही देशातील नागरीक विशेषत: तरुण वर्ग निर्बुद्ध झाल्यासारखा सर्व सहन करीत आहे. लोकांच्या संघर्षाची धार कमी होण्यासाठी सत्ताधार्यां नी जात, पात, पंथ व धर्म यात लोकांना गुंतवून ठेवले. त्यामुळे देशातील तरुण वर्ग षंढ होऊन, आपली प्रतिकार शक्ती गमावून बसला आहे. अशा परखड शब्दात त्यांनी आजच्या समाजाच्या स्थितीचे परखड वर्णन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. केशवराव ठाकरे होते. प्रास्ताविक व संचलन डॉ. तुषार देशमुख यांनी केले. आभार ज्ञानेश्वर डवरे यांनी मानले. याप्रसंगी श्री संत गुलाबराव महाराज संस्थेच्या अध्यक्षांसह सर्व संचालक, श्री. संत गुलाबराव महाराज वाचनालय व ग्रंथालयाचे संचालक मंडळसह मुरली माकडे, सरपंचा मंदा पावडे, संस्थेचे माजी अध्यक्ष कोल्हे गुरुजी, अध्यक्ष प्रदिप चौधरी, उपाध्यक्ष मीना चौधरी, सचिव कुणाल पटवर्धन, संचालक सुभाष पटवर्धन, मदन भाटे, किशोर पटवर्धन, डॉ. सुनील देशमुख उपस्थित होते.

आपले सरकार सेवा केंद्रच्या संचालकाने केली सरपंचाची तक्रार

रिद्धपूर येथील प्रकार, मानसिक त्रास देत असल्याचा आरोप | गटविकास अधिकाऱ्यांकडे कारवाईची मागणी

महासागर प्रतिनिधी

मोर्शी,(दि.4) - आपले सरकार सेवा केंद्राद्वारे नागरिकांना योग्य प्रकारे सर्व सेवा पुरवित असतानाही सरपंच विनाकारण कोणत्या ना कोणत्या कारणाने आपल्याला मानसिक त्रास देत असल्याचा आरोप या केंद्राच्या संचालकाने केला आहे. यासंदर्भात त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली असून आवश्यक काग्रवाहीची मागणी केली आहे. आपले सरकार सेवा केंद्राचे समोरील शटर बंद करण्याचा बेकायदेशीर ठराव करण्याचा घाट सरपंचाकडून घातला जात असून त्याला प्रतिबंध घालावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

मोर्शी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या रिद्धपूर ग्रामपंचायत येथे आपले सरकार सेवा केंद्र अने वर्षांपासून सचिन डवके चालवित आहे. ग्राम पंचायतचे सर्व ऑनलाइन कामे तसेच दिले जाणारे सर्व प्रकारचे दाखले नागरिकांना वेळेतच दिल्या जातात. महसूल अंतर्गत येणारे दाखले, उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर, अधिवास प्रमाणपत्र व शासनाच्या सर्व योजनेचे काम नागरिकांना गेल्या 13 वर्षांपासून उपलब्ध करून दिल्या जात आहेत. असे डवके यांनी म्हटले आहे. आपले सरकार सेवा केंद्र नागरिकांना दुरूनच दिसावे म्हणून शासनाने 15 वित्त आयोग या निधी अंतर्गत रिद्धपूर येथील केंद्र चालक यांना 2 लाख 11 हजार रुपये खर्च करून आपले सरकार सेवा केंद्र स्वतंत्र इमारत बांधकाम इस्टिमेटनुसार समोरील बाजूस शटर बसवण्यात आले आहे. या इमारतीत 6 महिन्यापूर्वी पासून आपले सरकार सेवा केंद्र सुरू झाल्यामुळे नागरिकांची सोय झाली आहे. येथे कामाकरिता मोठ्या संख्येने लोक येतात. केंद्र चालकाविरोधात विरोधात एकही तक्रार नसतांना सुद्धा सरपंचांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून 24 फेब्रुवारी रोजी झालेल्या ग्रामपंचायतच्या मासिक सभेमध्ये आपले सरकार सेवा केंद्राचे समोरील शटर बंद करण्यात यावे, याकरिता पंचायत अधिकारी यांना ठराव घेण्याकरिता सागितले. परंतु सदस्यांनी याला विरोध केला.

नाहक बजावली नोटीस

या केंद्राचा कुठलाही त्रास नसल्याने तसे करण्यास या सदस्यांनी नकार दिला. काही सदस्य हे तटस्थ होते. त्यानंतरही 28 फेब्रुवारी रोजी संगणक परिचालक यांना सरपंचांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून आपले कामकाज असमाधानकारक असल्याबाबत व आपले सरकार सेवा केंद्राचे समोरील शटर बंद करण्याची नोटीस दिली. सरपंच राजकीय द्वेषापोटी मानसिक त्रास देत असल्याचे संचालकाचे म्हणणे आहे. त्याला कंटाळून गटविकास अधिकार्यांपकडे तक्रार देत असल्याचे त्यांनी सांगितले. सरपंचाच्या नावाने त्यांचे पती ग्रामपंचायतच्या शासकीय कामात हस्तक्षेप करुन कटकारस्थान रचत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. याला आवर घालण्याची मागणी त्यांनी गटविकास अधिकार्योंकडे केली आहे.

स्वराज्य सप्ताह व सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ

जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचा उपक्रम

युवकांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा उद्देश

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.4) - आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या अमरावती जिल्हा ग्रामीण समितीतर्फे प्रदेश कार्यालयाकडून प्राप्त कार्यक्रमानुसार स्वराज्य सप्ताह व पक्षाच्या सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन पक्षाच्या नवसारी येथील नवीन कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी आमदार सुलभा खोडके यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या, माजी महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सुरेखा ठाकरे होत्या. अमरावती जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व तालुकाध्यक्ष तथा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीविषयी नेत्यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांनी राजकीय पक्षाच्या संघटनात्मक बांधणी सोबतच विविध पातळीवर कार्य करणार्या पदाधिकार्यां ना व कार्यकर्त्याला उद्योगाच्या माध्यमातून आर्थिक सक्षम करण्याचा प्रयत्न करून उत्पन्नस्तोत्र निर्माण करण्यासाठी पक्षाकडून सहकार्य करण्यात येणार असल्याचे सांगितले. सुरेखा ठाकरे यांनी आपल्या भाषणादरम्यान विविध संघटनात्मक प्रश्नांवर भाष्य केले. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे त्या म्हणाल्या. यावेळी सर्व तालुक्यातील पदाधिकार्यां च्या उपस्थितीमध्ये सदस्य नोंदणी अर्जाचे वितरण करण्यात आले. प्रत्येक तालुक्यातून सभासद नोंदणी अभियान सुरू करण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला राज्य कार्यकारणी सदस्य बाळासाहेब पाटील, अमरावती कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक प्रताप भुयार, बाळासाहेब राऊत, राष्ट्रवादी युवक काँग्रेस विदर्भ अध्यक्ष निखिल ठाकरे, महिला जिल्हाध्यक्ष प्रा. शोभना देशमुख, सुषमा बर्वे, शहर अध्यक्ष प्रशांत डवरे, प्रविण भुजाडे, गुड्डू पठान, ऋतुराज राऊत, प्रशांत ठाकरे, सरला इंगळे, तारेश देशमुख, रवि बुरघाटे, गोविंद शिरोया, अजय अग्रवाल, माधुरी शिंगणे, तुषार चिखलकर, अब्दुल नईम अब्दुल जलील, दिनेश वंजारी, अभिजीत हरणे, अभिषेक शुक्ला, प्रज्वल महात्मे उपस्थित होते.